33/प.वि.

कार्यालयीन उपस्थिती
उशीरा उपस्थितीची तपासणी.

20160111124466007

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : समय-१००५/डीआयपी-४/प्र.क्र.३५/०५/१८ (र.व का.)
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 3 ऑक्टोबर,२००५.

पहा :- १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : समय-१०८८/१९/अठरा (र.व का.), दिनांक ३१ ऑगस्ट,१९८८.
२.शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : समय-१०१२/प्र.क्र.५३/१८ (र.व का.), दिनांक ३१ ऑक्टोबर,१९९२,
३.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : समय-२००१/१००३/१८ (र.व का.), दिनांक २९ जानेवारी,२००२.

## परिपत्रक

प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहाण्याविषयी व उशीराने उपस्थित होणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्या बाबत योग्य ती कारवाई करावी या विषयी वेळोवेळी शासन निर्णय / परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या असून सुध्दा शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय कार्यालयामध्ये अनेक शासकीय अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर येत नाहीत, तसेच कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वीच कार्यालयातून निघून जातात. त्यामुळे शासकीय कामांसाठी कार्यालयामध्ये आलेल्या लोकप्रतिनिधींची आणि जनतेची गैरसोय होते, त्यांची कामे वेळेवर होण्यास अडचणी येतात. कामाचे तास कमी झाल्यामुळे कामाचा निपटारासुध्दा प्रभावीपणे केला जात नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे. तरी अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयामध्ये वक्तशीर उपस्थित रहाण्याचे आदेशांचे काटेकोर पालन करण्याविषयीच्या सूचना मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील प्रशासकीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावी.

महसूल विभागांमधील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी वेळेवर कार्यालयांत येत आहेत याची खात्री करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांचेवर सोपविण्यात येत आहे. विभागीय पातळीवर त्यांनी स्वतंत्र पथके स्थापन करुन अधिकारी व

कर्मचारी वेळेवर येतात किंवा नाही याची खात्री अशा पथकांनी शासकीय कार्यालयांना अचानक भेटी देऊन करावी.

जिल्ह्यामधील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर उपस्थित रहात आहेत हे पाहण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे. त्यांनी शासकीय कार्यालयांना अचानक भेटी देण्यासाठी अधिका-यांच्या नेमणूका करुन तपासणीची धडक मोहीम हाती घ्यावी. तपासणीच्या वेळी कार्यालयात दिसून न आलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कडक कारवाई करावी अशी शिफारस त्यांच्या वरिष्ठाकडे करुन आणि शिथील पर्यवेक्षणाबद्दल संबंधित कार्यालय प्रमुखांना जबाबदार धरुन अशा कार्यालय प्रमुखावरही कारवाई करण्याची शिफारस करावी.

वरीलप्रमाणे सर्व विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कारवाई सुरु करावी व या विषयीचा अनुपालन अहवाल (३ प्रतीत) शासनास सादर करावा. तसेच अचानक तपासणी विषयीचा अहवाल दरमहा शासनास पाठवून द्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा.मे.प्रेमकुमार)
शासनाचे मुख्य सचिव.

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव (५ प्रती)
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती)
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव (५ प्रती)
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
५) शासनाचे मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,
७) प्रधान सचिव,विधान मंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई (५प्रती)
८) सर्व मंत्रालयीन विभाग,
९) महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) सर्व जिल्हाधिकारी,
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३) मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/प्रादेशिक प्रमुख/कार्यालय प्रमुख,
१४) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१५) निवड नस्ती (कार्यासन १८)